# प्रेस नोट ता. ०८/०७/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## माथाडीच्या नावाखाली लुटमार करणा-या टोळीला अटक

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

माथाडीच्या नावाखाली व्यवसायीक व कामगार यांचेत दहशत माजवुन आर्थीक लुटमार करणा-या प्रत्येक इसमांवर कडक कारवाई झाली पाहीजे याबाबत शासनाने वेळोवेळी सुचना पारीत केल्या आहेत. **मा.श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड** यांनी पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना माथाडी अनुषंगाने तक्रारी प्राप्त झालेस त्या तात्काळ दाखल करुन आरोपींवर कडक कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत. जेणेकरुन उदयोजकांमध्ये एक भयमुक्त वातावरणात काम करणेकरीता विश्वास निर्माण होईल.

दि.०५/०७/२०२३ रोजी १९.०० वा सुमा. स्टार बाझार समोर माऊली चौक वाकड पुणे येथे फिर्यादी फिर्यादी नामे अनिकेत रविंद्र वाडीया वय २४ वर्षे रा. पीएमसी कॉलनी, पांडवनगर, शिवाजीनगर,पुणे यांचे मालकीचे रेजीम व्हिस्टा फॅसिलीटीज सर्व्हिसेस प्रा.लि. चे असिस्टंट मार्केटींग एक्झीक्युटीव्ह सुर्यकांत वाघमारे व रोहन कांबळे असे प्रमोशनल ॲक्टीव्हीटी करत असतांना तेथे एका पांढरे रंगाचे फॉर्च्युनर गाडीतुन बबलु जोगदंड व त्याचे सोबत आणखी दोन ते तीन अनोळखी इसम आले त्यांनी फिर्यादीस व सोबत सहका-यांना मी माथाडी कामगार संघटनेचा अध्यक्ष असुन माझे परवानगी शिवाय येथे कामगार कस काय ठेवले ? काम कसे काय करत आहात? असे बोलुन त्यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्याचे हातातील टायटन कंपनीचे घडयाळ व हातातील सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढुन घेवुन तेथुन निघुन गेले. त्यांनी केलेल्या मारहाणी मध्ये फिर्यादीस डोक्याला, तोंडाला,पोटाला, कंबरेला, पायाला मार लागला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ६४०/२०२३ भादविक ३९४,५०४,५०६,३४ प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करणेत आला आहे.** सदर गुन्हयाचे तपासात सी.सी.टी.व्ही फुटेज आणि साक्षीदार यांचेकडे केले तपासात फिर्यादी यांना एकुण ०५ लोकांनी मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात **भा.द.वि. कलम ३९५ चा अंतर्भाव** करण्यात आला आहे.

सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेवुन मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना आरोपी नामे बबलु जोगदंड व त्याचे साथीदारांचा शोध घेवुन ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तपास पथकाचे दोन वेगवेगळे पथके तयार केली. आरोपींचा शोध घेत असताना दि.०६/०७/२०२३ रोजी सपोनि.संतोष पाटील यांना विश्वासु बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, बबलु जोगदंड हा वाशी नवी मुंबई येथे त्याचे साथीदारांसोबत लपुन बसला आहे. अशी बातमी मिळालेने सपोनि.संतोष पाटील यांनी सोबतचे स्टाफचे मदतीने वाशी नवी मुंबई येथे जावुन सापळा कारवाई करुन बबुल जोगदंड व त्याचा साथीदार समीर शेख यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी गुन्हयाची कबुली देवुन सांगीतले की, आम्ही व आमचे गुन्हयातील साथीदार नामे मयुर बाळासाहेब सरोदे, करण सदाफळ चव्हाण, रोशन पवार असे आम्ही मिळुन फिर्यादीस माथाडी संघटनेचे अध्यक्ष असल्याचे सांगत फिर्यादीस मारहाण करुन आर्थिक लुटमार करण्याचे उद्देशाने त्याचेकडील सोन्याची अंगठी व घडयाळ असे जबरदस्तीने लुटुन नेले आहे. त्या दोघांचे कडे सखोल तपास करून गुन्हयातील अजुन दोन अरोपींना ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्हयात १) रमाकांत ऊर्फ बबलु राजेंद्र जोगदंड वय ३० वर्षे रा.मंगलनगर वाकड पुणे २) समीर ऊर्फ बबलु नझीर शेख वय ३३ वर्षे रा.मॉ गंगा कॉलनी नढेनगर काळेवाडी पुणे ३) मयुर बाळासाहेब सरोदे वय २३ वर्षे रा.समीर भुजबळ चौक, पुनावळे पुणे ४) करण सदाफळ चव्हाण वय २४ वर्षे रा.पिरबाबा मंदीराजवळ पुनावळे गावठाण पुणे असे एकुण ०४ आरोपींना अटक करण्यात आली असुन आरोपींची दिनांक ११/०७/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड प्राप्त आहे.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी रमाकांत ऊर्फ बबलु राजेंद्र जोगदंड वय ३० वर्षे हा असुन तो सराईत गुन्हेगार आहे त्याचेवर यापुर्वी गुन्हे खालीलप्रमाणे दाखल आहेत. तो **माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षारक्षक,जनरल कामगार युनियन चा पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष आहे.**

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं.कलम |
|---|---|---|
| १ | वाकड | १०००/२०२१ भादविक ३७९,४२७,३४ |
| २ | वाकड | ४९३/२०१९ भादविक ३०७,४५२,३२३,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४,२५ महापोकाक.३७(१)(३)१३५ |

| | | |
|---|---|---|
| ३ | वाकड | ७७/२०१५ भादविक ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४ |
| ४ | चतु:श्रींगी | २०७/२०१५ भादविक ३९५,१२०(ब) |
| ५ | हिंजवडी | ३२३/२०१२ भादविक १४३,१४७,१४९,४५२,३२६ |
| | आरोपी **समीर ऊर्फ बबलु नझीर शेख** याचेवर दाखल गुन्हा | |
| १ | वाकड | २२४/२०१५ भादविक ३०७,१२०(ब),३४ अजाअज प्रति काक.३(१)(१०)३(२)(५) |

तसेच दि.०४/०७/२०२३ रोजी ज्योतीबा नगर काळेवाडी या ठिकाणी तीन ट्रक चालक यांना आरोपी नामे **सुरेश बाबुराव बनसोडे वय ३७ वर्षे रा. आकाश गंगा सोसायटी समोर,रहाटणी पुणे** याने त्याचेकडील काळया रंगाचे सफारी कार आडवी लावुन तो **माथाडी जनरल कामगार युनियन ट्रान्सपोर्ट चा पिंपरी चिंचवड शहर सचिव आहे** असे सांगत चालकांना तुम्ही माझ्या एरियामधुन मला पैसे न देता कसा काय माल घेवुन जाणार? असे म्हणुन प्रत्येकी १० हजार रूपये खंडणी मागितली व हातामध्ये लोखंडी रॉड ने धाक धपटशहा करून ट्रकचा आरश्याची काच फोडुन १०००/- रुपये बळजबरीने काढुन घेतले. अशी तक्रार प्राप्त झाल्याने तात्काळ वाकड पोलीस ठाणे कडिल अधिकारी व अंमलदार हे घटनास्थळी जावुन आरोपी यास ताब्यात घेवुन घटनेबाबत फिर्यादी नामे सागर काकासाहेब मारनुर वय २५ वर्षे रा. अभिसेवाडी, ता.सांगोला,जि. सोलापुर यांचे तक्रारीवरून वाकड पोलीस ठाणे **गु.र.नं.६३४/ २०२३ भा.द.वि.कलम ३९२,३८५,३४१,४२७** प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी यास अटक करण्यात आला आहे.

**नोट :- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयतर्फे आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सर्व उदयोजकांना/व्यावसायीकांना आवाहन करण्यात येते कि, कोणीही माथाडी संघटनेचे नावाने धाक-दपटशहा केल्यास अथवा रोख रक्कमेच्या स्वरूपात खंडणी मागीतल्यास निर्भयपणे तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास (संपर्क क्र. (०२०) २७३५२५००, ११२) या क्रमांकावर किंवा जवळचे पोलीस ठाण्यास संपर्क करावा जेणेकरुन संबंधीतावर ठोस कायदेशीर कारवाई करता येईल. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सर्व उदयोगधंदे भयमुक्त आणि शाश्वत वातावरणात सुरू राहण्यास हवेत.**

सदरची कारवाई मा.श्री.विनयकुमार चौबे सो पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो सह.पोलीस आयुक्त, मा.श्री.वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त सो, मा.श्री.डॉ.काकासाहेब डोळे सो पोलीस उप आयुक्त परि-२, मा. श्री.डॉ. विशाल हिरे सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, सपोनि.अनिल लोहार, पोउपनि.मक्सुद मणेर, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर कोतवाल, पोशि.हेमंत गुत्तीकोंडा, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड